जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१९/०८/२०२४
## दि.१८/०८/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १९७/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम १०९,मपोअ ३७(१)सह १३५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २३ वर्ष रा.कोंढवा बुाा, पुणे |
| **आरोपीत** | एक इसम वय ६० वर्ष रा.वैष्णवी देवी हाईट्स,पहिला मजला,सुखसागर नगर गल्ली नं.०८ कोंढवा बुाा,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १७/०८/२०२४ रोजी सांय १७/३० लोअर इंदिरानगर शनिमंदिराच्या बाहेरील पुजा साहित्य विक्री दुकानावर बिबवेवाडी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पुजा साहित्य विक्रीच्या दुकानावर पुजा साहित्य विक्री करत असताना यातील नमुद इसम तेथे येऊन जुन्या किरकोळ वादाच्या कारणावरुन फिर्यादी यांचेशी बोलत-बोलत फिर्यादी यांचे पाठीमागुन जावुन फिर्यादी यांचे एका हाताने तोंड दाबुन,मला मारायला येतो काय,आत्ता तुला खल्लासच करतो असे म्हणून फिर्यादीस जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने उजवे बाजुचे गळ्यावर चाकुने वार करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला फिर्यादी याने चाकू पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याचे डावे हाताच्या अंगठ्यास जखम झाली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. येवले मो.नं.८८८८८०२२५२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २७६/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३०५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४३ वर्षे रा.टिंबर मार्केट पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०८/२०२४ रोजी सकाळी ०७/३० चा ते ११/०० वा च्या सुमारास २८९२ न्यु कल्पतरु सोसायटी बिल्डींग नं.०४ प्लॅट नं.४२ न्यु टिंबर मार्केट पुणे व १८८४ रघुसिता अपार्टमेंट नातु बाग सदाशिव पेठ पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते फ्लॅटचे उघडया दरवाजावाटे,कोणीतरी अज्ञात इसमाने घरामध्ये प्रवेश करुन रोख रक्कम २५,०००/- रुपये व सोन्याचे दागिने असा १७,६०,०००/- रुपये किंमतीचा व तसेच साक्षीदार रा.नातु बाग सदाशिव पेठ पुणे यांचे राहते घरातुन रोख रक्कम १६००/-रुपये व २६,३५०/-रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने असा एकुण १८,१२,९५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हा फिर्यादी यांचे संमतीशिवाय, लबाडीने चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.सुरवसे मो.नं.९८२३०२७३६७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २३०/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम २८१ १०६(१) सह मो.वा.कायदा कलम १८४,१३४,(अ) (ब) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३५ वर्षे रा.पिंपळे सौदागर पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात वाहना वरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १८/०८/२०२४ रोजी दुपारी १३/३० वा.चे सुमा. जुना पुना मुंबई हायवे वर बोपोडी रेल्वे स्टेशन जवळील गोपीचाळ येथे |

**तपशिल** यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील अज्ञात वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी यातील फिर्यादी यांचा भाऊ नामे रमेश बुग्या लावुड्या वय ४३ वर्षे रा.शास्त्रीनगर चौक ज्ञानराज शाळे शेजारी पिंपरी चिंचवड पुणे हा चालवत असलेल्या मोटार सायकलला जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी.देशमुख मो.नं.९८२१२६८७६

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** अलंकार पो स्टे १३४/२०२४,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक महिला वय ५३ रा.कोथरूड पुणे

**आरोपीत** मोबाईल धारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०३/०४/२०२४ ते दिनांक ०५/०६/२०२४ रोजी दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक यांनी शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करण्याच्या माध्यमातून रक्कम देवून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून त्यांनी दिलेल्या बँक खातेवर पैसे ट्रान्सफर करणेस सांगुन कोणताही परतावा परत न देता फिर्यादी यांची एकुण ८,५०,११९/- रूपयेची आर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) चव्हाण मो.नं.९६५७१५८७५०

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** वारजे पो स्टे ३२४/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक महिला वय ५५ वर्षे,रा.कर्वेनगर,पुणे

**आरोपीत** मोबाईल धारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१६/०५/२०२४ ते दि.२८/०५/२०२४ रोजी पर्यंत ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक यांनी टास्कमध्ये पैसे गुंतवणुक करण्याचे सांगुन व त्यांनी सांगितलेल्या हॉटेलला रिव्हीव देण्याचा टास्क देवून त्यातून भरपूर नफा मिळवून देतो असे आमिष दाखवून त्यांचे बेनिफिशिअरी बँक खाते धारक व वापरकर्ते, यांच्या खात्यामधे फिर्यादी यांचे बँक खाते व फिर्यादी यांचे मुलीच्या बँक खाते मधून रक्कम ५,२४,१००/-रूपये भरण्यास भाग पाडून कोणतीही रक्कम परत न करता फिर्यादी यांची अर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) मनोज शेडगे मो.नं.९८७०२०९९८०

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** खडक पो स्टे २७५/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०३(२)

**फिर्यादी** एक इसम वय २७ वर्षे,रा.शिवाजीनगर पुणे

**आरोपीत** कुमार विजय शिंदे वय ४१ वर्ष रा.मल्हार मार्तंड सोसायटी सहकारनगर पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक १२/०८/२०२४ रोजी सायंकाळी १७/३० वा.ते १७/४५ वा.चे दरम्यान नाईक घाटे आर्किटेक्स ऑफिस समोर सुभाषनगर शुक्रवार पेठ पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांनी त्यांची गाडी वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी हि लॉक लावुन पार्क केली असता वरील नमुद इसमाने गाडीचे डिक्की मधुन रोख ३,००,०००/- रुपये फिर्यादीचे संमतीशिवाय मुद्दाम लबाडीचे इरादयाने चोरुन नेले आहेत.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी.अनिल सुरवसे,मो.नं.९८२३४२७३६७

७

**पो.स्टे.गुरनं./कलम** लोणीकंद पो स्टे ८१२/२०२४,भारतीय न्याय संहिता ३२६(ढ),१२५,३५२,३५१(२),३२४ (४),सह महाराष्ट्र पोलीस का.कलम ३७(१),१३५ सह फौजदारी (सुधारणा) कायदा २०१३ चे कलम ३,७

**फिर्यादी** एक इसम वय ३४ वर्षे रा. वाघोली ता.हवेली जि.पुणे

**आरोपीत** चार इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१८/०८/२०२४ रोजी रात्रौ ०१/२० वा.चे सुमारास फिर्यादीचे राहत्या घरासमोर मोकळ्या जागेत वाघोली ता.हवेली जि.पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी यांनी त्यांचे राहत्या घरी लावलेल्या दोन मोटार सायकल यांचे वर नमुद इसमांनी कोणता तरी ज्वलनशील पदार्थ टाकून जाळून मोटार सायकलचे एकुण ८०,०००/- रुपयाचे

| | |
|---|---|
| | नुकसान करुन त्यांचे हातातील दांडके हवेत फिरवून दहशत पसरवून फिर्यादी यांना शिवीगाळ करून व तुला पण असेच जाळेन अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.वैजिनाथ केदार,मो.नं.८१०४०६६७१६ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १७८/२०२४,भारतीय न्याय संहिता कलम १८९(२),१८९(४),१९०,१९१(२),१९१(३) ,३५२,१३१,३५१(२),(३),३२४(४),आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३)सह १३५,क्रिमिनल लॉ अमेंडमेंट कलम ७ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३७ वर्षे रा.भवानी पेठ,पुणे |
| **आरोपीत** | पाच इसम त्यांचेसोबत इतर ४ ते ५ अनोळखी मुले (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १७/०८/२०२४ रोजी रात्रौ २३/०० वा.चे सुमारास एम.के.सोडा दुकान समोर,भारत टॉकीज शेजारी,भवानी पेठ,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचा भाचा असे दुकानात असताना यातील नमुद इसम असे हातात लाकडी बांबु,स्टीलचे रॉड व स्टीलचे हत्यार हातात घेवुन भारत टॉकीज जवळील पार्कीगमध्ये पार्क केलेली स्प्लेंडर मोटार सायकल चे पुढील हेडलाईटचे कव्हर व फिर्यादी यांचा भाऊ याचे आयशर कंपनीचा ट्रक हीचे समोरचे काचेवर लाकडी बांबु,दगड व स्टीलचा रॉड मारून नुकसान केल्यावर फिर्यादी यांनी त्यांना जाब विचारला असता त्या सर्वांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करून त्यांचे अंगावर धावुन येवुन जादा बोला तो तुझे छोडुंगा नही,असे म्हणुन सदर परिसरात हत्यारे हवेत फिरवुन शिवीगाळ करत दहशत निर्माण करून निघुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सुहास पिटील, मो.नं.९३२६२७७५८२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**